# २. इतिहासलेखन

भारतीय परंपरा

**भारतीय इतिहास लेखनाची वाटचाल :**

* प्राचीन काळातील इतिहास लेखन -

प्राचीन भारतात मौखिक परंपरेने इतिहास जतन केला जाई . एक पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हा इतिहास सांगितला जाई. भारतात इ.स.पूर्व 3000 वर्षे वा त्याही पूर्वी पासून लेखनकला अस्तित्वात होती. (पुरावा- हडप्पा संस्कृतीत सापडलेले लेख)

भारतातील ऐतिहासिक स्वरूपाचे प्राचीन साहित्य कोरीव लेखाच्या स्वरूपात आहे. इ. स - पूर्वी तिसऱ्या शतकापासून ( मौर्य सम्राट अशोक) प्रस्तारांवर आणि दगडी स्तंभावर कोरलेले आढळतात.

इ.सनाच्या पहिल्या शतकापासून धातूची नाणी,मूर्ती, शिल्पे,ताम्रपट इ. वरील कोरीव लेखनातून ऐतिहासिक माहिती मिळते. त्यातून राजांचा काळ, वंशावळ,राज्यविस्तार, शासनव्यवस्था, समाजिकरचना इ.माहिती मिळते.

प्राचीन भारतीय साहित्यामध्ये रामायण, महाभारत ही महाकाव्ये, पुराणे, जैन, बौद्ध ग्रंथ, ऐतिहासिक साहित्य ,परकीय प्रवाशांची प्रवास वर्णने ही इतिहास लेखनाची साधने आहेत. इ.स. च्या ७ व्या शतकात बाणभट्टाने लिहिलेल्या 'हर्षचरित्र' या संस्कृत काव्यात ऐतिहासिक चरित्र वर्णिले आहे, त्यात तत्कालिन सर्व अंगांचे वास्तव चित्रण आहे.

* मध्ययुगीन काळातील इतिहास लेखन-

१२ व्या शतकात क्लहण याने राजतरगिनी ( काश्मीरच्या इतिहास) वरील ग्रंथ लिहिला. मध्ययुगीन भारतात मुस्लीम राजकर्त्यांच्या दरबारातील इतिहास कारकांच्या लेखनावर अरबी आणि फारसी इतिहास लेखनाचा प्रभाव दिसतो.

झियाउद्दीन बरनी याच्या 'तारीख– इ –फिरूजशाही' या ग्रंथात इतिहास लेखनाचा हेतू स्पष्ट लिहिला आहे . इतिहासकाराने केवळ राज्यकर्त्याच्या पराक्रमाचे वर्णन करायचे नाही तर त्याच्या दोषांचे, चुकीच्या धोरणांचे विवेचन करायला हवे. त्यामुळे इतिहास लेखनाची व्याप्ती वाढली.मुघल बादशहांच्या दरबारातील इतिहासकार राज्यकर्त्यांची स्तुती लिहू लागले. तसेच सुंदर चित्रांचा अंतर्भाव केला जाऊ लागला. मुघल साम्राज्याचा संस्थापक बाबर याच्या 'तुझुक इ बाबरी' या आत्मचरित्रात त्याच्या युद्धाची वर्णने, त्याने प्रवास केलेले प्रदेश, त्याची वर्णने, स्थानिक अर्थव्यवस्था, रितीरिवाज इत्यादी आहेत. अबुल फजल याने अकबरनामा या ग्रंथात ऐतिहासिक कागदपत्रांचे काळजीपूर्वक संकलन केले आहे. त्याची याबाबतीतील संशोधनपद्धती पूर्वग्रहविरहित व वास्तववादी होती.

'बखर' या ऐतिहासिक साहित्य प्रकारात शूरवीरांचे शौर्य, थोरांची चरित्रे इत्यादी आहेत. उदा. सभासद बखर, छत्रपती राजारामांच्या काळात कृष्णाजी अनंत सभासद यांनी ही बखर लिहिली. यातून शिवरायांची माहिती मिळते. भाऊसाहेबांची बखर, पानिपतची बखर यातून पानिपतच्या लढाईची वर्णन समजते.

आधुनिक काळातील इतिहास लेखन-

विसाव्या शतकात ब्रिटिशांची राजवट होती. भारतीय पुरातत्त्व सर्व्हेक्षण खात्याचे पहिले सरसंचालक अलेक्झांडर कर्निंगहॅमच्या देखरेखीखाली अनेक प्राचीन स्थळांचे उत्खनन केले गेले. जॉन मार्शल यांच्या काळात हडप्पा संस्कृतीचा शोध लागला.त्यातून भारतीय संस्कृती इ. स. पूर्व ३००० किंवा त्याहूनही जूनी असावी हे सिद्ध झाले. भारतात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केलेल्या लेखनात त्यांच्या वसाहतवादी धोरणाचा प्रभाव दिसतो.

इ.स.1817 द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया या जेम्स मिल या ब्रिटिश अधिकाऱ्याने लिहलेल्या ग्रंथात वस्तू निष्ठतेचा अभाव पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन दिसतो.

इ.स. 1941 माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन या मुंबई च्या गव्हर्नररांनी 'द हिस्टरी ऑफ इंडिया ' हा ग्रंथ लिहिला.

जेम्स ग्रट डफ याने ' द हिस्टरी ऑफ द मराठाज ' हा ग्रंथ लिहिला.

यात ही भारतीय संस्कृती व इतिहास कमी लेखला गेला आहे. कर्नल टॉड याने राजस्थानचा इतिहास लिहिला. विल्यम विल्सम हंटर याने 'हिंदुस्थानच्या द्विखंडात्मक इतिहास' निःपक्षपातीपणाने लिहिला.

**भारतीय इतिहासलेखन : विविध तात्त्विक प्रणाली :**

**1 . वसाहतवादी इतिहासलेखन :** सुरूवातीला भारतीय इतिहासाचा अभ्यास ब्रिटिश अधिकारी, ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी केला. त्यातील बऱ्याच जणांनी भारतीय संस्कृती गौण दर्जाची आहे असे लेखन केले. तसेच त्यांनी वसाहतीच्या सत्तेचे समर्थन केले . 'केंब्रिज हिस्टरी ऑफ इंडिया' या ग्रंथाच्या पाच खंडात वसाहतवादी इतिहासलेखन आहे .

**2. प्राच्यवादी इतिहासलेखन :** युरोपातील काही अभ्यासकांना पूर्वेकडील देश– भारताबद्दल संस्कृतीबद्दल कुतूहल, आदर वाटत होता त्यांना प्राच्यवादी म्हणतात . त्यांनी संस्कृत व युरोपीय भाषामधील साधर्म्य शोधले. त्यातून इंडो-युरोपीय भाषेची त्यांनी कल्पना मांडली. 1784 मध्ये विल्यम जोन्स यांनी कोलकता येथे एशियाटिक सोसायटीची स्थापना करून भारतीय वाङःमय व इतिहास यांच्या अभ्यासाला चालना दिली . फ्रेडरिक मॅक्सम्युलर या जर्मन प्राच्यवादीने संस्कृत ही इंडो युरोपीय भाषांगटातील अति प्राचीन शाखा होती असे म्हटले. त्याने 'हितोपदेश' या संस्कृत ग्रंथाचा जर्मनमध्ये अनुवाद केला. ऋग्वेदाचे संकलन, ऋग्वेदाचा जर्मनीत अनुवाद केला .

**३. राष्ट्रवादी इतिहासलेखन -**

इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय इतिहासकारांच्या लेखनात भारताच्या संस्कृती, प्राचीन वैभव यांचा अभिमान जाणवतो. त्यांनी त्यातून भारतीयांची आत्मजाणीव जागृत केली. त्यांच्या लेखनाला राष्ट्रवादी इतिहास लेखन म्हटले गेले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी राष्ट्रवादी इतिहास लेखन केले . ब्रिटिशांनी लिहिलेल्या पूर्वग्रहदूषित इतिहासाचा त्यांनी विरोध केला .पण ऐतिहासिक वास्तवाची चिकित्सा भारतीय इतिहास लेखनात दिसत नाही .महादेव रानडे ,रामकृष्ण भांडारकर, सावरकर, वासुदेव मिराशी हे राष्ट्रवादी इतिहासकार होते . आपला इतिहास आपण लिहिला पाहिजे. इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन असायला हवे असे वि . का.राजवाडे यांचे मत होते .अस्सल कागदपत्रांचा आधार घेणे हा त्यांचा आग्रह होता .राष्ट्रवादी इतिहास लेखन स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणादायी ठरले. उदा .विनायक दामोदर सावरकरांचे लिहिलेले ' द इंडियन वॉर ऑफ इंडिपेंडन्स १८५७ चे स्वातंत्र्यसमर ' .

**4 . स्वातंत्र्योत्तर काळातील इतिहासलेखन :** - स्वातंत्र्योत्तर काळात समाज, विज्ञान, अर्थव्यवस्था, राजकीय प्रणाली, धार्मिक विचारसरणी, सांस्कृतिक पैलू इत्यादींचा अभ्यास केला गेला. या काळात इतिहासलेखनाचे तीन नवे वैचारिक प्रवाह आढळतात –अ) मार्क्सवादी इतिहास ब ) वंचितांचा इतिहास क ) स्त्रीवादी इतिहास

अ) मार्क्सवादी इतिहासलेखन – आर्थिकव्यवस्था, उत्पादनसाधने, उत्पादनाच्या प्रक्रियेतील मानवी संबंध सर्वसामान्य लोकांवर होणारा परिणाम इ. विचार या लेखनात मांडले गेले. दामोदर कोसंबी, कॉम्रेड डांगे , रामशरण शर्मा यांनी मार्क्सवादी लेखन केले. 'प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी' यात कॉम्रेड डांगे यांनी मार्क्सवादी इतिहासलेखन केले .

**5) वंचितांचा इतिहास :**

वंचितांचा इतिहास लोकपरंपरेतून अभ्यासता येतो. महात्मा ज्योतिराव फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनातून वंचितांच्या इतिहासाचा विचार मांडला गेला आहे. महात्मा फुले यांनी गुलामगिरी या पुस्तकात वंचितांचे शोषण मांडले. डॉ आंबेडकर यांनी ' हू वेअर शुद्राज' व 'द अनटचेबल' हे ग्रंथ लिहून वंचितांचा इतिहास सांगितला.

**6) स्त्रीवादी इतिहास :**

भारतीय इतिहास लेखक पुरुष असल्याने स्त्रीवादी इतिहास दुर्लक्षित राहिला. भारतीय इतिहासातील स्त्रियांचे स्थान व त्यांची कामगिरी यावर प्रकाश टाकणे आव्हान होते. ताराबाई शिंदे यांनी पुरुषप्रधान व्यवस्था व जाती व्यवस्था यांना विरोध करणारे लेखन केले .१८८२ मध्ये त्यांचे 'स्त्रीपुरुष तुलना' व १८८८ मध्ये पंडित रमाबाई यांचे 'द हाय कास्ट हिंदु वुमन' ही पुस्तके प्रसिद्ध झाले.

स्वातंत्र्योतर काळात स्त्रियांना घरी, कामाच्या ठिकाणी मिळणारी वागणूक त्यांच्या राजकीय समतेचा हक्क यावर लेख लिहिले गेले. मेरा कोसंबी यांचे स्त्रीवादी लेखन अलीकडच्या काळातील आहे. क्रॉसिंग थ्रेशिल्ड्स फेमिनिस्ट एस्सेज इन सोशल हिस्टरी या त्यांच्या पुस्तकात महाराष्ट्रातील कर्तबगार स्त्रियांचा जीवनावरील निबंध आहे. शर्मिला रेगे यांनी दलित स्त्रियांच्या दृष्टीकोनातून लेखन केले आहे.

य. दि फडके, रामचंद्र गुहा इत्यादी संशोधकांनी आधुनिक इतिहास लेखनात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे.